मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६९ वा • शनिवार, ता. १३ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कडक उपाययोजना- गृहमंत्री डॉ.जी. परमेश्वर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**



दरोडा, चोरी आणि खंडणीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्यात कायदा व सुव्यवस्थेच्या उपाययोजना अधिक कडक केल्या जाणार असल्याचे आश्वासन गृहमंत्री डॉ. जी. परमेश्वर यांनी विधान परिषदेत दिले. सदस्य किशोर कुमार पुत्तूर यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

वाहन चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रलंबित प्रकरणे शोधणे व प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी विविध उपाय राबविण्यात येत असल्याचे मंत्री परमेश्वर यांनी सांगितले. संघटित वाहन चोरी गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १११ अंतर्गत कठोर कारवाई केली जात आहे. या कारवाईमुळे आरोपींना सहज जामीन मिळणे कठीण होईल आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी रात्री गस्त वाढविण्यात आली असून, पोलिसांना संशयित व्यक्तींची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरवाज्यांना कुलूप असलेल्या घरांची माहिती पोलिस ठाण्यात जमा केली जात असून, कुटुंब परगावी जात असल्यास स्थानिक पोलिसांना माहिती देण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. होयसला वाहनांकडून अशा घरांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

गुन्हे शोधण्यासाठी संबंधित परिसरात फिरणाऱ्या संशयितांची चौकशी करण्यात येत असून, वाहन चोरी रोखण्यासाठी जनजागृती कार्यक्रमही सुरू आहेत. रात्री गस्त घालणाऱ्या अधिकाऱ्यांना चोरीच्या घटना सर्वाधिक नोंदविल्या जाणाऱ्या ठिकाणी वारंवार भेटी देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच गुन्हे विभागातील कर्मचाऱ्यांना अशा ठिकाणी रात्रीच्या वेळी लॉकिंग पद्धतीने गस्तीसाठी तैनात केले जात आहे. मंत्री परमेश्वर यांनी गेल्या तीन वर्षांत राज्यात नोंदविलेल्या चोरी व संबंधित गुन्ह्यांची माहिती सभागृहासमोर मांडली. रयत समाचार

# केंद्रीय मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

## २०२७ ला देशभरात जातनिहाय जनगणना

**नवी दिल्ली । रयत समाचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत आज ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जनगणनेला अखेर मंजुरी देण्यात आली असून २०२७ मध्ये देशभरात दोन टप्प्यात जातनिहाय सविस्तर जनगणना होणार आहे. या जनगणनेसाठी ११,७१८ कोटी रुपये निधीही मंजूर करण्यात आला आहे.

विरोधकांकडून सातत्याने जातनिहाय जनगणनेची मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर केंद्राच्या निर्णयाला व्यापक महत्त्व प्राप्त झाले असून आगामी मतदारसंघ बांधणीवरही या जनगणनेचा परिणाम होणार आहे. जनगणनेत देशातील प्रत्येक समाजगटाची वास्तविक लोकसंख्या, भौगोलिक वितरण आणि सामाजिक रचना याबाबत इत्यंभूत माहिती मिळणार आहे.

जनगणना दोन टप्प्यांत कशी होणार?

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली. पहिला टप्पा : एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ दरम्यान घरांची यादी आणि घरांची गणना केली जाईल. दुसरा टप्पा : फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्या गणना होईल.

बर्फवृष्टीच्या दुर्गम भागात लोकसंख्या गणना सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे वैष्णव यांनी स्पष्ट केले.

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे देशातील लोकसंख्या, सामाजिक रचना आणि प्रतिनिधित्व याबाबत नवीन दिशादर्शक प्रक्रिया सुरू होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

देशातील पहिली 'डिजिटल जनगणना' असणार आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने मोठ्या प्रमाणात अचूक व जलद माहिती संकलित करण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू.

### तपोवन वृक्षतोडीला राष्ट्रीय हरित लवादाची स्थगिती; न्यायिक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत झाड तोडण्यास मनाई

**नाशिक । रयत समाचार**

नाशिकमधील तपोवन येथे प्रस्तावित वृक्षतोडीला राष्ट्रीय हरित लवादाने मोठा धक्का देत अंतरिम स्थगिती दिली. न्यायिक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तपोवनमध्ये कोणतीही वृक्षतोड करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश लवादाने दिले असल्याची माहिती याचिकाकर्ते श्रीराम पिंगळे यांनी दिली. तपोवन परिसरातील वृक्षतोडीला गेल्या अनेक महिन्यांपासून नागरिक व पर्यावरणप्रेमींकडून व्यापक विरोध होत होता. स्थानिकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करून हा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर पोहोचवला होता. लवादाच्या आदेशानुसार, नाशिक महानगरपालिकेला न्यायप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत एकही झाड तोडण्यास सक्त मनाई करण्यात आली. लवादाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत.

## आंतरराष्ट्रीय लेखिका प्रा.शैलजा पाईक यांचे १३ डिसेंबरला आंबेडकरी स्मृती व्याख्यान

### दलित, स्त्रीवाद, मानवतावादाला नवी दिशा देणार

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

दलित स्त्रीवाद, मानवतावाद, जातिभेद व लिंगभेद या ज्वलंत मुद्यांवर मार्गदर्शक ठरणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यान २०२५ आज हैदराबादमध्ये होत असून, यंदाचे व्याख्यान सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय लेखिका व संशोधक प्रा. शैलजा डी. पाईक यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.



बोराबांडा येथील दलित अभ्यास केंद्राच्या सीडीएस सभागृहात, पाचव्या मजल्यावर आज १३ डिसेंबर रोजी दुपारी २.०० वाजता या महत्त्वपूर्ण व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील बहुविध वंचनांवर प्रकाश टाकणारे हे व्याख्यान मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासकांना आकर्षित करत आहे.

दलित अभ्यास, जात-अभ्यास, आधुनिक दक्षिण आशिया, मौखिक इतिहास, मानवतावाद अशा बहुआयामी क्षेत्रांमध्ये त्यांनी मौलिक संशोधन केले आहे. ज्ञानाचे वसाहतीकरण दूर करण्याच्या संकल्पनेला त्यांनी नवीन बौद्धिक दिशा दिली आहे.

प्रा. पाईक या महिलालिंगलैंगिकता अभ्यास, समाजशास्त्र आणि आशियाई अभ्यास विषयातील चार्ल्स फेल्प्स टाफ्ट विशिष्ट संशोधन प्राध्यापिका आहेत. त्यांना मॅकआर्थर फाउंडेशनची २०२४ ची ''जीनियस'' फेलोशिप मिळाल्याने आंतरराष्ट्रीय शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे विचार अधिक ठळक झाले आहेत.

**त्यांच्या 'दलित महिला शिक्षण :** आधुनिक भारतातील दुहेरी भेदभाव' (२०१४) या पुस्तकात दलित महिलांच्या शैक्षणिक संघर्षाचे वास्तव मांडले आहे.

**तर 'द वल्गरिटी ऑफ कास्ट :** दलित, लैंगिकता आणि मानवता आधुनिक भारतातील' (२०२२) या अभ्यासग्रंथात त्यांनी महाराष्ट्रातील जात, वर्ग, लिंग, लैंगिकता आणि लोकप्रिय संस्कृतीतील राजकारणाचे सम्यक विश्लेषण केले आहे.

या ग्रंथातून आद्य नृत्यांगणा नामचंद पवळा भालेराव हिवरगावकर, राष्ट्रपती पदक विजेत्या विठाबाई नारायणगावकर, तसेच कांताबाई सातारकर व सुरेखा पुणेकर अशा मोलाच्या महिला कलावंतांच्या ऐतिहासिक योगदानाचे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुनर्मूल्यांकन करण्यात आले आहे. हे व्याख्यान दलित स्त्रीवाद आणि मानवतावादाच्या नव्या दिशांचा वेध घेणारे ठरणार असून, समाजपरिवर्तनाच्या प्रश्नांवर नवे बौद्धिक आयाम उघडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रयत समाचार

# विनेश फोगाटची पुनरागमनाची घोषणा

## २०२८ ऑलिम्पिकसाठी तयारी सुरू

नवी दिल्ली । रयत समाचार

भारतीय कुस्तीतील दिग्गज आणि चर्चेत राहिलेली महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिने पुन्हा एकदा सर्वांना आश्चर्यचकित करत निवृत्तीचा निर्णय मागे घेतला आहे. ३१ वर्षीय विनेशने आता २०२८ लॉस एंजिल्स ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्याची अधिकृत घोषणा केली आहे.

२०२४ पॅरिस ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीपूर्वी फक्त १०० ग्रॅम ओव्हरवेट ठरल्याने तिला स्पर्धेबाहेर करण्यात आले होते. त्या घटनेनंतर संतापून तिने निवृत्ती जाहीर केली होती. मात्र काही काळ शांततेत राहिल्यानंतर तिच्या मनातील 'लढाऊ वृत्ती' पुन्हा जागी झाली असून ती पुन्हा पटावर परतली आहे.

सोशल मीडियावर पोस्ट करत विनेशने लिहिले की, ''लोक मला विचारतात पॅरिस हा शेवट होता का? मी दूर गेले होते पण विश्रांतीत मला कळलं की माझ्यातली ज्योत अजूनही जिवंत आहे. खेळ, शिस्त आणि लढाई माझ्यात रुजली आहे. त्यामुळे मी लॉस एंजिल्स २०२८ साठी पुन्हा तयारीला सुरुवात करत आहे.'' विनेशने पुढे तिच्या नव्या प्रवासातील सर्वात मोठी प्रेरणा सांगितली तिचा मुलगा. ''यावेळी मी एकटी नाही; माझा मुलगाही माझ्यासोबत आहे. तो माझा छोटासा चीअरलीडर असेल,'' असे तिने नमूद केले.

कुस्ती महासंघातील संघर्ष, राजकीय वाद, आणि पॅरिसमधील विवादानंतर विनेशचा हा मोठा निर्णय भारतीय कुस्तीविश्वासाठी उत्साहवर्धक मानला जात आहे.



## विधानभवन राडा प्रकरणी विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर

### देशमुख, टकले यांना शिक्षा व प्रवेशबंदीची शिफारस

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र विधानसभेत १७ जुलै २०२५ रोजी विधानभवन मुंबई येथील मुख्य पोर्चमध्ये झालेल्या धक्काबुक्की प्रकरणावर विशेषाधिकार समितीचा अहवाल सभागृहात सादर करण्यात आला. सन्माननीय सदस्य जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत नितीन हिंदुराव देशमुख आणि सदस्य गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत सर्जेराव बबन टकले यांच्यात झालेली ही धक्काबुक्कीची घटना विधानसभेची प्रतिष्ठा मलीन करणारी असल्याचे समितीने अहवालात स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने एकूण १० बैठका घेऊन विविध साक्षीदारांचे जबाब नोंदवले. घटनेचा सखोल अभ्यास करून अहवाल अंतिम करण्यात आला. समितीने विधानभवनाच्या सुरक्षिततेसाठी अनेक महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या आहेत. यात संसदेच्या धर्तीवर विधानमंडळाची स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था उभारणे, अभ्यागतांच्या प्रवेशासाठी सुस्पष्ट नियमावली तयार करणे, तसेच पोलीस डेटाबेसशी संलग्न स्वयंचलित पार्श्वभूमी तपासणी प्रणाली कार्यान्वित करणे यांचा समावेश आहे. या उपाययोजना राबवल्यास अशा प्रकारच्या घटनांना आळा बसू शकतो, असे समितीचे मत आहे.

या गंभीर कृत्यास उत्तरदायी धरत समितीने नितीन हिंदुराव देशमुख आणि सर्जेराव बबन टकले या दोघांना दोन दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्याची शिफारस केली आहे. तसेच येत्या २०२९ पर्यंत विधानभवन परिसरात त्यांच्या प्रवेशावर बंदी घालण्याचाही प्रस्ताव समितीने ठेवला आहे.

या अहवालामुळे विधानभवन परिसरातील सुरक्षा व्यवस्थेच्या पुनर्रचनेबाबत पुढील प्रक्रिया गतीमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेला मंत्रिमंडळाची मंजुरी



**मुंबई ।** ग्रामीण भागातील शेत व पाणंद रस्त्यांची वाढती गरज आणि मनरेगा योजनेंतर्गत येणाऱ्या अडचणींमुळे शेतकऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन राज्य मंत्रिमंडळाने मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना राबविण्यास मंजुरी दिली. या निर्णयाची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषद आणि विधानसभेत दिली.

बावनकुळे म्हणाले की, शेतीतील वाढते यांत्रिकीकरण लक्षात घेता ही योजना महसूल विभागामार्फत पूर्णतः यंत्रसामग्रीच्या सहाय्याने राबविण्यात येणार आहे. रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू असलेली 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' पूर्ववत सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या योजनेचा मुख्य उद्देश बारमाही आणि मजबूत रस्त्यांची निर्मिती करून पेरणी, मशागत, कापणी आणि शेतमाल वाहतूक यांना गती देणे हा आहे. यासाठी गाव नकाशांवर दर्शविलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे निर्देश देण्यात आले. रयत समाचार

## डॉ.कुलकर्णी यांना कर्नाटक राज्य मसापचा 'कायकरत्न' तर डॉ.राजन यांना 'काव्यरत्न' पुरस्कार


**कलबुरगी । श्रीकांत काकतीकर**

कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे प्रतिवर्षी दिल्या जाणाऱ्या साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. डॉ. राजेंद्र पडतुरे प्रायोजित 'मराठी भाषा कायकरत्न' पुरस्कार यंदा ज्येष्ठ मराठी साहित्यिक डॉ. उमा कुलकर्णी (बेळगावकन्या पुणे) यांना देण्यात येणार आहे. तर स्व. डॉ. वैजनाथ शेगेदार स्मृती 'मराठी भाषा काव्यरत्न' पुरस्कार बेंगळुरू येथील ज्येष्ठ लेखिका, कवयित्री डॉ. संध्या राजन अणवेकर यांना जाहीर झाला आहे.

कल्याणरत्न पुरस्काराची घोषणा अपरिहार्य कारणास्तव जानेवारी महिन्यात करण्यात येणार असल्याचे परिषदेतर्फे सांगण्यात आले.

बेंगळुरू येथील महाराष्ट्र मंडळ सभागृहात रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष गुरय्या स्वामी यांनी दिली.

कन्नड साहित्याचे मराठी भाषेत भव्य रूपांतर करण्याचे कार्य डॉ. उमा कुलकर्णी यांनी दशकानुदशके केले आहे. त्यांनी डॉ. शिवराम कारंत, डॉ. एस. एल. भैरप्पा, पूर्णचंद्र तेजश्वी, सुधा मूर्ती, चंद्रशेखर कंबार, गिरीश कर्नाड, डॉ. यू. आर. अनंतमूर्ती यांच्यासह अनेक कन्नड नामवंत



साहित्यिकांच्या ६२ हून अधिक कृत्यांचे मराठीत अनुवादन केले आहे. त्यांच्या साहित्यसेवेला महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

ज्येष्ठ कवयित्री डॉ. संध्या राजन अणवेकर यांच्या 'संध्या राजन' या साहित्यनावाने अनेक मराठी साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्यांनी अलीकडेच नांदेडचे नामवंत कवी प्रा. देविदास फुलारी यांच्या 'रात्र भरात आहे' या कवितासंग्रहाचे कन्नडमध्ये 'इरुळू अरळीदे' नावाने भाषांतर केले आहे. मागील ३० वर्षांपासून त्या कर्नाटकात मराठी साहित्यसेवा करीत आहेत. सध्या बेळगाव येथील सरकारी विश्वेश्वरय्या तांत्रिक विद्यापीठात कौशल्य अभिवृद्धी विभागप्रमुखनिर्देशक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या 'काजव्यांची दिंडी', 'नातिचरामी', 'चांदवा', 'तुला शोधताना', 'मी तुझी मीरा', 'मनाचा कवडसा', 'सातरंगी कमान', 'गारवा' अशा एकूण आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

कन्मसापच्या अलीकडील बैठकीत सरकार्यवाह प्रा. विजयकुमार चौधरी, उपाध्यक्ष बी. ए. कांबळे, कार्यवाह प्रभाकर सलगरे, कोषाध्यक्ष मिलिंद उमाळकर, तसेच प्रमोद शहा, नरसिंग मराठे, नरसिंग पाटील, प्रा. हणमंत बिराजदार, डॉ. नारायण रोळेकर उपस्थित होते. रयत समाचार

# माळीवाडा वेशीवर संकट!

### ऐतिहासिक ठेव्याच्या संरक्षणासाठी 'इतिहासप्रेमी' सक्रिय

**अहमदनगर । आबीद खान**

अहमदनगर शहराच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतिक असलेल्या माळीवाडा वेशीला पाडण्याचा बेकादेशिर प्रयत्न सुरू असून, यास नागरिकांचा तीव्र विरोध उमटू लागला आहे. शहरातील अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळ आणि विविध इतिहास जाणिवेचे नागरिकांनी आज भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय), अहमदनगर उपमंडळाच्या संवर्धन सहाय्यक एच.जे. दसरे यांना मागणीपत्र देत माळीवाडा वेशीचे संरक्षण तातडीने करावे, महानगरपालिका प्रशासक यशवंत डांगेंच्या या कृत्यास हरकत घ्यावी, अशी मागणी केली.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, ऐतिहासिक अहमदनगर व गौरवशाली अहिल्यानगरच्या इतिहासाचा प्राण असलेली माळीवाडा वेस, जिच्या कुशीत महात्मा फुले यांचा पुतळा पिढ्यानपिढ्या उभा आहे, त्या वेशीस पाडण्याचा प्रयत्न बाहेरगावाहून आलेल्या काही अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून होत आहे. त्यांना शहराच्या इतिहासाशी काहीही घेणेदेणे नाही. अहिल्यानगर मनपा प्रशासक यशवंत डांगे



यांनी पाडकामासंदर्भातील नोटीस 'नवा मराठा' दैनिकात प्रसिद्ध केल्यानंतर नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे.

इतिहासप्रेमी मंडळाने स्मरण करून दिले की, २०१८ मध्ये दिल्लीगेट वेस पाडण्याचे असेच षड्यंत्र रचले गेले होते; मात्र त्यास इतिहासप्रेमींसह एएसआयने तीव्र विरोध दर्शवून ती वेस वाचविली. त्याचप्रमाणे एएसआयने पुढाकार घेऊन आवश्यक झाल्यास न्यायालयात जाण्याची तयारी दाखवावी आणि माळीवाडा वेस पाडण्यापासून तात्काळ थांबवावे, अशी मागणी केली आहे.

माळीवाडा वेस पाडली गेल्यास यासाठी एएसआयच्या बेजबाबदारपणालाही जबाबदार धरले जाईल,''असा इशारा देण्यात आला आहे.

शिष्टमंडळात आसिफखान दुलेखान, भैरवनाथ वाकळे, इंजि. अभिजित वाघ, तुषार सोनवणे आदी सहभागी होते. मागणीपत्रावर ऋषीकेश आगरकर, शुभम झिंजे आदींसह नागरिकांच्या सह्या आहेत. अहमदनगरच्या इतिहासाचा जिवंत पुरावा असलेली माळीवाडा वेस वाचवण्यासाठी नागरिकांची एकजूट वाढत असून, या प्रकरणी एएसआय काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. रयत समाचार

**अहिल्यानगर महानगरपालिकेवर टीका**

''ज्या ऐतिहासिक कोट आणि वेशींच्या संरक्षणासाठी नगरपालिकेची स्थापना झाली, तीच महानगरपालिका आज त्यांच्या अस्तित्वावर घाला घालत आहे, हे खेदजनक आहे.''

## भाजप शिंदेसेनेचे मनोमिलन; महापालिकांमध्ये युतीचा फॉर्म्युला ठरला

**मुंबई । रयत समाचार**

नगरपालिका आणि नगर परिषद निवडणुकांमध्ये झालेल्या तणावानंतर शिवसेना शिंदे गट आणि भाजप या महायुतीतील दोन प्रमुख पक्षांनी आगामी महापालिका निवडणुकांसाठी मतभेद मागे सारण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक पातळीवर उमेदवार निवड, गटबाजी आणि संघटनात्मक स्पर्धेमुळे दोन्ही पक्षांत काही दिवसांपासून नाराजीची स्थिती होती. विशेषतः भाजप प्रदेशाध्यक्ष रमेश चव्हाण यांच्या पक्षप्रवेश मोहिमेमुळे कल्याण-डोंबिवली परिसरात तणाव अधिक वाढल्याचे दिसले या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे आणि रविंद्र चव्हाण यांच्यात अधिवेशनादरम्यान महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत महापालिका निवडणुका एकत्र लढवण्यावर दोन्ही पक्षांत एकमत झाले. त्यानंतर भाजपचे केंद्रीय नेतृत्वही या निर्णयाला पाठिंबा देत शिंदेफडणवीस यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती मिळते.

# अल्पसंख्यांक विकास योजनांची अंमलबजावणी करावी

## महा मायनॉरिटी फोरमची जिल्हाधिकारी कार्यालयात मागणी

**अहमदनगर । आबीद खान**

राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत असल्या तरी त्या जिल्हा पातळीवर प्रभावीपणे अंमलात येत नाहीत. त्यामुळे या योजनांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी महा मायनॉरिटी फोरमतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली.



संघटनेचे राज्य प्रमुख जाकीर शिकलगार, कार्याध्यक्ष डॉ. असलम बारी, सचिव मोहसीन शेख, ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण, सय्यद वहाब, आर्किटेक्ट अर्शद शेख, उर्दू साहित्य परिषदेचे सचिव आबिद दुलेखान, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष खान साहब, सामाजिक कार्यकर्ते अफजल शेख, रेहान काझी, इस्माईल पठाण, गोटू जहागीरदार, सय्यद अजीज, बशीर पठाण, इस्माईल पापामियां शेख, फकीर मोहम्मद शेख आदींनी जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी व जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांची भेट घेतली. यावेळी अल्पसंख्यांक समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र अल्पसंख्यांक कक्ष उभारणे, कक्षासाठी नामफलक लावणे, महिला वसतिगृहाचे काम तातडीने पूर्ण करणे, तसेच जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळांच्या शिक्षकांच्या समस्या सोडवण्याची मागणी केली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शासनाच्या समित्यांनी अल्पसंख्यांक समाजाला ''मागासल्यापेक्षा मागास'' असे घोषित केले आहे. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यस्तरावर धोरणे तयार होतात; मात्र जिल्हा पातळीवर अंमलबजावणीदरम्यान उदासीनता दिसून येते, असे संघटनेने म्हटले आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :** १) जिल्हा अल्पसंख्यांक विकास कार्यालय सुरू करणे: जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार दिला असला तरी कर्मचारी नसल्याने योजना राबविण्यात अडथळे येतात. कार्यालयासाठी आवश्यक क्लार्क, शिपाई नेमणूक करावी, मोठ्या आकाराचे फलक लावावेत, योजनांची जनजागृती करावी, प्रस्ताव मंत्रालयास वेळेत पाठवावेत, पंतप्रधान १५ कलमी कार्यक्रम, कौमी सप्ताह व अल्पसंख्यांक हक्क दिन नियमानुसार राबवावा, अशी मागणी करण्यात आली. २) जिल्हा अल्पसंख्यांक विकास सनियंत्रण समितीच्या तिमाही बैठकांचे आयोजन: अशासकीय सदस्यांची नियुक्ती असो वा नसो, बैठक घेऊन समस्या सोडवण्यावर भर द्यावा. ३) अल्पसंख्यांक हक्क दिन (१८ डिसेंबर) व कौमी सप्ताहाचे नियमित आयोजन: शासनाच्या नव्या परिपत्रकाची प्रतीक्षा न करता निधीचा योग्य वापर करून कार्यक्रम आयोजित करावेत, निधीची मागणी व अहवाल आयोगाकडे पाठवावा.

संघटनेने चेतावणी दिली की दुर्लक्ष झाले तर प्रशासकीय बेजबाबदारीविरोधात संविधानिक मार्गाने लढा उभारला जाईल. जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी दीपक दातीर यांनी अल्पसंख्यांक विभागाच्या विविध योजनांचा अभ्यास सुरू असून जिल्ह्यात या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

# दिव्यांगांच्या मागण्यांसाठी प्रहार अपंग क्रांतीचे धरणे



**अहमदनगर । रयत समाचार**

दिव्यांग आणि निराधार लाभार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या तात्काळ अंमलबजावणीसाठी प्रहार अपंग क्रांती संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ता. १२ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव आणि कार्यकर्त्यांनी शासनाच्या निर्णयांची अंमलबजावणी न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत विविध योजनांतील त्रुटींकडे लक्ष वेधले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, स्थानिक आमदार निधीतून दिव्यांग सहाय्यासाठी ३० लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याची शासनाची तरतूद आहे; मात्र अनेक ठिकाणी त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे सांगण्यात आले. सर्व आमदारांना निधी दिव्यांगांसाठीच वापरण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली. निराधार योजनेतील मुलांची २५ वर्षांची अट शासनाने रद्द केली असली तरी त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचेही संस्थेने म्हटले. तसेच उत्पन्न मर्यादा ५० हजारांवरून १ लाख रुपये करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली.दिव्यांग पेन्शन १५०० वरून २५०० रुपये करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून तो तातडीने लागू करून विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनात करण्यात आली.

आंदोलनाचे नेतृत्व ॲड. लक्ष्मण पोकळे, लक्ष्मी देशमुख, मधुकर घाडगे आणि पोपट शेळके यांनी केले. यावेळी मनीषा जगताप, राजेंद्र गांगर्डे, राजेंद्र पोकळे, दत्तात्रेय तनपुरे, हरिभाऊ रकटे, मच्छिंद्र आले, तात्यासाहेब गिरगे, सीराज शेख, आनंद भागवत, तोडकर, सचिन पांढरे, संजय गुंड, वैभव घोरपडे, मीनाक्षी दारुणकर, संतोष वाकचौरे, संदेश गलांडे, नानासाहेब खगले, पराजी भोसले, गणेश शेळके, भरत ढेरंगे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रहार अपंग क्रांती संस्थेने प्रलंबित मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला.

# नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**अहमदनगर । आबीद खान**

एच.व्ही. देसाई नेत्र रुग्णालय आय केअर इन्स्टिट्यूट, हिंद आय केअर, मखदूम सोसायटी, आलमगीर अल्पसंख्याक बहुउद्देशीय संस्था तसेच मुजुभाई फ्रेंड सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ता. १४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आलमगीर चौक रिक्षा स्टॉप, आलमगीर नगर येथे भव्य नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती हिंद आय केअरचे अल्ताफ शेख यांनी दिली. या शिबिरामध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, संगणकीकृत नेत्र तपासणी, अल्पदरात चष्मे वाटप, मोफत तिरळेपणा शस्त्रक्रिया, तसेच तज्ञांकडून मार्गदर्शनासह सविस्तर नेत्र तपासणी अशा विविध सेवा नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. शिबिरात सहभागी होणाऱ्यांना अचूक निदान व आवश्यक उपचार मोफत देण्यात येणार असल्याचे मुजाहीद सय्यद यांनी सांगितले.

या उपक्रमाचे आयोजन हिंद आय केअरचे अल्ताफ शेख (डी. ऑप्टो.), शेख गुलाम दस्तगीर आणि सामाजिक कार्यकर्ते मुजाहीद सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. परिसरातील सर्व नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपल्या नेत्र आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन तन्वीर चष्मावाला यांनी केले.

आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असून मोठ्या प्रमाणावर सहभागाची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

# १८ जानेवारीला दिव्यांग कर्मचारी, अधिकारी संघटनेची सभा

**अहमदनगर । सलीमखान पठाण**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी, अधिकारी संघटनेची सर्वसाधारण सभा ता. १८ जानेवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली असून या सभेत जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी निवड होणार आहे. या सभेला संघटनेचे राज्याध्यक्ष साईनाथ पवार, राज्य सचिव ललित सोनवणे, तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष साहेबराव अनाप यांनी दिली. तसेच दिव्यांग कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न, संघटनेची आगामी भूमिका आणि कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे.

सर्व दिव्यांग बांधवभगिनींनी या सभेला उपस्थित राहावे, असे आवाहन कार्याध्यक्ष राजू आव्हाड, कोषाध्यक्ष राजेंद्र औटी, सचिव पोपट धामणे, बन्सी गुंड, राजेंद्र ठुबे, साहेबराव मले, रमेश शिंदे, विजय राऊत, किरण माने, भारत तोरमल, सचिन लोंढे, रावसाहेब तांबे, श्रीकांत दळवी, सचिन रनाते, नंदकुमार खंडागळे आदीनीही उपस्थितीचे आवाहन केले आहे.




सामाजिक कार्यकर्ते मयूर बोचूघोळ यांच्या पुढाकाराने वाढती थंडी लक्षात घेऊन गरजूंना उबदार चादरींचे वाटप करताना उपस्थित मान्यवर. (छाया: एक्सप्रेस फोटो)

# आनंद पार्श्व गुरुकुलचे आज स्नेहसंमेलन

**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

श्री आनंद पार्श्व गुरुकुल, केडगावचे भव्य स्नेहसंमेलन शनिवार, ता. १३ डिसेंबर रोजी केसर-गुलाब मंगल कार्यालय, आनंदधाम येथे दुपारी २.०० वाजता होत आहे. शाळेचे हे चौथे वर्ष असून राष्ट्रसंत प.पू. आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. कुंदन ऋषीजी महाराज व संस्कारप्रेमी आलोक ऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सोनेवाडी रोड, केडगाव येथे या शैक्षणिक संकुलाची भव्य इमारत उभारण्यात आली आहे. शिक्षा, सेवा आणि संस्कार या त्रिसूत्री ब्रीदवाक्याचा आधार घेत सर्व स्तरातील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. या स्नेहसंमेलनासाठी मुख्य अतिथी म्हणून आयएएस आनंद सुभाष भंडारी उपस्थित राहणार आहेत. तसेच विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध उद्योजक व शिक्षणप्रेमी आनंदराज चंदनमल मुनोत आणि ट्रस्टचे कार्याध्यक्ष प्रो. डॉ. अशोककुमार पगारिया (कासारवाडी) मार्गदर्शन करणार आहेत.



स्नेहसंमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून विद्यार्थी-पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. शाळेच्या वर्षभरातील शैक्षणिक, कलात्मक आणि सांस्कृतिक प्रगतीचे आकर्षक सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण, लोकनृत्य, सामाजिक संदेश देणारी लघुनाट्ये तसेच विविध प्रादेशिक नृत्यांचे कार्यक्रम सादर केले जाणार असून हेच या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी मोठे परिश्रम घेतले आहेत. व्यवस्थापन समितीने सर्व पालक, हितचिंतक व नागरिकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन केले आहे.

**-: जाहीर नोटीस :-**

**श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**

**श्री. आनाजी सदा घुले**
रा. शेडगाव ता.श्रीगोंदा, जि अहिल्यानगर
विरुध्द
ग्रामपंचायत, शेडगाव

जन्म नोंद अर्ज क्र. ११५६४/२०२५

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री.आनाजी सदा घुले यांनी त्यांचा जन्म मौजे शेडगाव येथे झाला आहे. सदर व्यक्तीचा जन्म ग्रामपंचायत, शेडगाव ता श्रीगोंदा जि-अहिल्यानगर तसेच तहसील कार्यालय, श्रीगोंदा, (अभिलेख कक्ष) जि-अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने जन्म नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे जन्म ची नोंद होणबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर राहु होऊन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, श्रीगोंदा
तहसीलदार श्रीगोंदा

**-: जाहीर नोटीस :-**

**श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**

**श्री. संभाजी बाळासाहेब बोबडे**
रा. शेडगाव ता.श्रीगोंदा, जि अहिल्यानगर
विरुध्द
ग्रामपंचायत, शेडगाव

जन्म नोंद अर्ज क्र. ११५६३/२०२५

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री.संभाजी बाळासाहेब बोबडे यांनी त्यांची आई कै. शालन बाळासाहेब बोबडे हिचा मृत्यू मौजे शेडगाव येथे झाला आहे. सदर व्यक्तीचा मृत्यू ग्रामपंचायत, शेडगाव ता श्रीगोंदा जि-अहिल्यानगर तसेच तहसील कार्यालय, श्रीगोंदा, (अभिलेख कक्ष) जि- अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने मृत्यू नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे मृत्यू ची नोंद होणबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर राहु होऊन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, श्रीगोंदा
तहसीलदार श्रीगोंदा

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहिराती पाठवाव्यात
अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780
संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?



* अधिक माहितीसाठी संपर्क *
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585


दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# अभ्यासक्रमात संविधानाचा समावेश पाहिजे

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिनानिमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा.



दौंडमधील आम्ही भारताचे लोक ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही.

संविधान लागू होऊन आज ७६ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद


आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य, अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे.

भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

# भटक्या कुटुंबातील ऋतिक गजरची आयएसपीएलसाठी निवड

**श्रीगोंदा । माधव बनसुड**

गुजरातमधील सुरत येथे ९ जानेवारी २०२६ पासून होणाऱ्या इंडियन स्ट्रीट प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी फाल्कॉन हैदराबाद संघात श्रीगोंदा फॅक्टरी येथील जोशी वस्तीतील भटक्या कुटुंबातील ऋतिक गजर याची निवड झाली. ऋतिकच्या निवडीची बातमी समजताच जोशी वस्ती तसेच श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.



ऋतिक गजर सध्या श्रीगोंदा फॅक्टरी येथील एस.एस.के. संघाकडून खेळतो. लहानपणापासूनच क्रिकेटची आवड जपणाऱ्या ऋतिकचे प्राथमिक शिक्षण जोशी वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. पुढे पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण इंदिरा गांधी विद्यानिकेतन, श्रीगोंदा फॅक्टरी येथे, तर अकरावीबारावीचे शिक्षण छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे पूर्ण केले. महाविद्यालयीन पदवी त्याने महाराजा जिवाजीराव शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथे पूर्ण केली.

ऋतिकचे वडील सुनील गजर हेही क्रिकेट खेळायचे. ते भटके ज्योतिषी तसेच म्हशींचा व्यापार करून उदरनिर्वाह करतात. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत विविध कामे करत कुटुंबाचा आधार बनत ऋतिकने शिक्षण पूर्ण केले. आपल्या जिद्दीच्या जोरावर मिळवलेले हे यश संपूर्ण कुटुंबाच्या सहकार्यामुळेच शक्य झाले असून, मिळालेल्या संधीचे सोने करून स्वतःला सिद्ध करण्याचा निर्धार असल्याचे ऋतिकने सांगितले.या प्रवासात संतोष नागवडे, अशोक काळाणे, मधुकर काळाणे, तेजस जाधव, शिवाजी पोटे, तुषार वंजारे, ऋषिकेश जोहरी , अभिजित राऊत यांचे मोलाचे सहकार्य ऋतिकला लाभले.

आयएसपीएलमधील निवडीमुळे श्रीगोंदा परिसरातील तरुण खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळत आहे.

> ऋतिक गजर हा लेफ्ट हँडेड बॅट्समन असून तो यापूर्वी संतोष नागवडे यांच्या इव्हेलन टीम, श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना क्रिकेट टीम तसेच हमराज मृत्युंजय पुणे यांच्या टीमकडून व्यावसायिक क्रिकेटमध्ये खेळला आहे.

## शिक्षक अभियोग्यता परीक्षा २,२०७ उमेदवारांचे निकाल रद्द

**पुणे ।** शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ मधील २,२०७ उमेदवारांचे निकाल आवश्यक व्यावसायिक अर्हतेची कागदपत्रे मुदतीत न सादर केल्याने रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली.

बी.एड, डी.एल.एड. ''अपीअर्ड'' नमूद केलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र एक महिन्यात जमा करणे बंधनकारक होते. वारंवार सूचना करूनही कागदपत्रे न दिल्याने निकाल रद्द झाले. यादी www.mscepune.in वर उपलब्ध असून कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही. असे परीक्षा परिषदेने कळविले आहे.

# देवदत्त गुंडूला वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक



**अहमदनगर । रयत समाचार**


मॉस्को (रशिया) येथे नुकत्याच झालेल्या वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टिंग फेडरेशनतर्फे आयोजित वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करताना अहिल्यानगरचा खेळाडू देवदत्त गुंडू याने १२५ किलो हेवीवेट गटात उत्कृष्ट कामगिरी करीत रौप्यपदक पटकावले. पॉवरलिफ्टिंग या क्षेत्रात आजवर असलेली मॉस्कोची मक्तेदारी मोडीत काढत पहिलेपटीत भारताला रौप्यपदक मिळवून देण्याचा मान देवदत्त गुंडूने मिळवला आहे.

स्पर्धेनंतर देवदत्त गुंडू नगरमध्ये आगमन झाल्यावर तोफखाना येथे त्याचा उत्साहात सत्कार करण्यात आला. तोफखाना मित्र मंडळाचे अध्यक्ष सूरज जाधव यांच्या हस्ते देवदत्तचा सन्मान करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक, रहिवासी व मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# मार्गशीर्ष आला, वासुदेव हरवला
## उरली परंपरेची नादमधुर आठवण

**बेलापूर । शफीक बागवान**

मार्गशीर्ष महिना सुरू झाला की गावागावांत ''वासुदेव आला हो, वासुदेव आला...'' असा गोड गजर घुमायचा. मोराच्या पिसांचा टोप, रंगीत फेटा, मोत्यांच्या माळा, अंगावर झगा–धोतर आणि हातात टाळ–चिपळ्या अशा पारंपरिक वेशात वासुदेव घराघरांत जाऊन भजन, कीर्तन आणि पुराणातील प्रसंग सादर करत. मात्र बदलत्या जीवनशैलीच्या वेगात ही समृद्ध सांस्कृतिक परंपरा आता लोप पावत चालली असून अनेक ठिकाणी केवळ आठवणीतच शिल्लक राहिली आहे.



पूर्वी पहाटे अंगणात सडा–सारवण, रांगोळी आणि पारिजातकाचा दरवळ भरलेला असायचा. महिलांना वासुदेवाची स्वारी शुभ मानली जात असल्याने त्यांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहिली जात असे. ''सकाळच्या दानाने दिवस मंगल होतो'' या श्रद्धेमुळे वासुदेवांचे गाणे, टाळ– चिपळ्यांचा मंजुळ नाद आणि भक्तिगीते घरात प्रसन्नता निर्माण करीत. पुराणांमध्येही वासुदेव परंपरेचा उल्लेख आढळतो. श्रीकृष्णाच्या वडिलांशी निगडित ही परंपरा पेशव्यांच्या काळात विशेष बहरली. धार्मिक उत्सवांमध्ये समाजाला धर्म, संस्कृती आणि नैतिक मूल्यांची शिकवण देण्याचे कार्य वासुदेवांनी केले. ''घे घे घे हरिनाम घे, माया सारी सोडून दे'' या गीतांमधून त्यांच्या अध्यात्मिक संदेशांचा प्रभाव लोकांवर दृढपणे उमटत असे.

गेल्या काही वर्षांपर्यंत ग्रामीण भागात व शहरांमध्येही वासुदेवांचे तितक्याच उत्साहाने स्वागत केले जात होते. पैसे, अन्नधान्य किंवा कपडे देऊन जनता त्यांचा सन्मान करत. श्रद्धा, अध्यात्म आणि संस्कृती जपण्याचे काम या परंपरेमुळे सातत्याने होत राहिले.

परंतु वर्तमानातील आधुनिकतेच्या वेगवान लाटेत ही शतकानुशतकांची परंपरा हळूहळू लोप पावताना दिसत आहे. वासुदेवांचे स्वर, त्यांचे गाणे, त्यांच्याकडून मिळणारे अध्यात्मिक मार्गदर्शनहे सगळे आता क्वचितच ऐकू येते. सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनासाठी हा क्षीण होत चाललेला हा नाद समाजाला खंतावून टाकतो आहे.

**वासुदेवाची गाणी ऐकण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा**

# मेंढी जंत निर्मूलन शिबिर समारोप



**राहुरी । रयत समाचार**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील सर्वसमावेशक मेंढी सुधार प्रकल्प, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग आणि रोटरी क्लब, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने कोळेवाडी (ता. राहुरी) येथे मेंढ्यांचे जंत निर्मूलन शिबिर आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम कुलगुरु डॉ. विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

मेंढ्या जमिनीलगत चरण्यामुळे त्यांना जंतांची बाधा होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे नियमित जंत निर्मूलन आवश्यक असल्याचे सांगताना डॉ. कांबळे यांनी, लेंडी तपासणीनुसार योग्य जंतनाशक निवडल्यास अधिक प्रभावी परिणाम दिसून येतात, अशी माहिती शेतकऱ्यांना दिली. या मोहिमेसाठी रोटरी क्लब, राहुरी सेन्ट्रलचे अध्यक्ष अविनाश साबरे, सचिव डॉ. जयंत कुलकर्णी आणि डॉ. विक्रम कड यांनी रोटरी क्लबच्या आर्थिक सहकार्यातून उच्च प्रतीचे जंतनाशक उपलब्ध करून दिले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र निमसे तसेच मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयातील इंटर्नशिप विद्यार्थी यांनी शिबिरात सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमात सुमारे २००० मेंढ्या आणि शेळ्यांचे जंत निर्मूलन करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाचे डॉ. चांगदेव वायाळ तसेच कोळेवाडी ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य दिले.

# आत्मा मलिकचा पै. बजरंग शिरसाठ राज्यस्तरीय कुस्तीत अव्वल



**पाथर्डी । नितीन गटाणी**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, ओरोस येथे पार पडलेल्या १४ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत आत्मा मालिक कुस्ती केंद्राचा मल्ल पै. बजरंग गहिनीनाथ शिरसाठ (वजनीगट : ५७ किलो) याने पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत रौप्यपदक पटकावले.

पै. बजरंग शिरसाठ हा पाथर्डी बाजार समितीचे माजी सभापती गहिनीनाथ शिरसाठ आणि जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या उज्वला शिरसाठ यांचा मुलगा आहे. बजरंगच्या यशामागे विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाणचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, आत्मा मालिक कुस्ती केंद्राचे संचालक व राष्ट्रीय कुस्ती पंच भरत नायकल, आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच विवेक नायकल, तसेच कुस्ती कोच अशोक पाटील आणि अक्षय डांगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

राज्यस्तरावरच्या या चमकदार कामगिरीबद्दल बजरंग शिरसाठचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेमधील बजरंगची ही यशस्वी झेप पाथर्डी तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.

> कुटुंबीयांचे पाठबळ आणि गुरुजनांकडून मिळणारे मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाले. आगामी काळात आणखी चांगली कामगिरी करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करणार आहे.
> **– पै. बजरंग गहिनीनाथ शिरसाठ**

# स्वप्निल बुलाखे याची राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**अहमदनगर । रयत समाचार**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धा गोंदिया येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत आर्मी पब्लिक स्कूलचा विद्यार्थी स्वप्निल महादेव बुलाखे याने उत्कृष्ट कामगिरी सादर करत सुवर्णपदक पटकावले असून त्याची आगामी शालेय राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.स्वप्निलच्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष निलेश शेलार, सचिव धीरज वाघमारे, जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष नितीन शेलार, कार्याध्यक्ष सचिन मकासरे यांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरले. त्याचप्रमाणे आर्मी पब्लिक स्कूलच्या प्राचार्या नूतन मिश्रा, उपप्राचार्या संगीता काटे, तसेच क्रीडा शिक्षिका सोनाली मॅडम यांचे मार्गदर्शन स्वप्निलला लाभले. स्वप्निलच्या पुढील वाटचालीसाठी राजेंद्र गोरखे व कृष्णा बुलाखे यांनीही शुभेच्छा दिल्या.स्वप्निलच्या राष्ट्रीय स्तरावरील निवडीमुळे शाळा, जिल्हा आणि प्रशिक्षकवर्गातून त्याचे अभिनंदन.

# उपनगर पाणीप्रश्नावर बैठक; हंडा मोर्चा स्थगित

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगाव उपनगरातील मागील सहा महिन्यांपासून गंभीर झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने तातडीची बैठक घेत सुधारित जलपुरवठ्याचा निर्णय जाहीर केला आहे. पाणीप्रश्न न सुटल्यास १२ डिसेंबर रोजी हंडा मोर्चा काढण्याची नागरिकांची घोषणा असताना, वाढीव १२ लाख लिटर पाणीपुरवठ्याचे आश्वासन मिळाल्याने हा मोर्चा स्थगित करण्यात आला असल्याची माहिती माजी सभापती मनोज कोतकर यांनी दिली.

महापालिकेतील पाणीपुरवठा विभागात झालेल्या बैठकीत जल अभियंता परिमल निकम यांनी सांगितले की केडगावला सध्या ७५ लाख लिटर पाणीपुरवठा केला जातो. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर हा पुरवठा अपुरा पडत असल्याने दररोजच्या जलपुरवठ्यात चार तासांची वाढ करण्यात येणार असून, यामुळे उपनगराला अतिरिक्त १२ लाख लिटर पाणी मिळणार आहे.

बैठकीस माजी सभापती मनोज कोतकर, इंजि. महादेव काकडे, तसेच केडगावचे वॉटर सप्लाय कर्मचारी उपस्थित होते. पाणीपुरवठा नियोजन, कमी दाबाची समस्या आणि पुढील उपाययोजना यावर सविस्तर चर्चा झाली.

कोतकर म्हणाले की, ''केडगावची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना पाणीपुरवठा मात्र पूर्वीइतकाच आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## संकटग्रस्त माळीवाडा वेस



पालकमंत्री कार्यालय येथील भिंतीवरील दिमाखात उभ्या असलेल्या माळीवाडा वेशीचे सुंदर चित्र